**पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**दिनांक 05/11/2019 (मंगळवार)**
**(सकाळ)**

---

## घरफोडी

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 03 कि.मी अंतरावर मौजा वडंम्बा येथे दिनांक 02/11/2019 चे 15:00 ते दिनांक 03/11/2019 चे 15:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– शारदा अजय जैयस्वाल, वय 30 वर्ष, रा. वडंम्बा यांचे घराचे अज्ञात आरोपीने कुलूप तोडून घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने फिर्यादींच्या घरातील कपाटात ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने कि. 10,000/–रू. व नगदी 5,000/–रू. असा एकुण कि. 15,000/–रू. चा मुद्येमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री. प्रविण बोरकुटे हे करीत आहे.

## दुखापत

1) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 2 कि. मी. अंतरावर केसलापुर मौदा येथे दिनांक 03/11/2019 चे 19:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– जितेन्द्र राजाराम बावने, वय 34 वर्ष, रा. केसलापुर मौदा व त्याचा पुतन्या नामे– सुरज बावने व रामकृष्ण राजाराम उके हे तीघेही घरासमोर सिमेंट रोडवर बसले असतांना आरोपी नामे– ज्ञानेश्वर टिकाराम बावने, रा. केसलापुर, मौदा याने दारूच्या नशेत त्यांना शिवीगाळ केली. दरम्यान त्यास हटकले असता आरोपीने घरात जावुन लोखंडी वस्तुने सुरजला मारहाण करून जखमी केले. तसेच आरोपीने जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा कुथे हे करीत आहे.

2) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 5 कि. मी. अंतरावर मौजा सोनुर्ली येथे दिनांक 03/11/2019 चे 08:00 वा. दरम्यान आरोपी क्र. 1) मनोज रामजी गवळी, वय 40 वर्ष व 2) सौ अश्विनी गवळी दोन्ही रा. सोनुर्ली नागपुर यांनी संगणमत करून फिर्यादी नामे– सौ कलावती रामाजी गवळी वय 65 वर्ष रा सोनुर्ली नागपुर यांनी झाडलेला कचरा आरोपीचे घरात टाकल्याचे कारणावरून फिर्यादीला शिवीगाळ केली. यानंतर आरोपीतांनी फिर्यादीला काठी व हातबुक्की मारहाण केले तसेच फिर्यादीचे डोके भिंतीवर आपटुन त्यांना गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा धवराळ हे करीत आहे.

3) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 6 कि. मी. अंतरावर मौजा नगरधन येथे दिनांक 04/11/2019 चे 11:36 वा. दरम्यान फिर्यादी नामे– राधेश्याम दशरथ धोपटे, वय 58 वर्ष, रा. नगरधन यांच्या घरात आरोपी नामे– सुनिल पंढरीनाथ वाडीभस्मे, रा. शितलवाडी रामटेक याने अनाधिकृतपणे प्रवेश करून जुन्यावादाच्या कारणातुन वाद घातला. यानंतर आरोपीने चाकुसारख्या धारदार वस्तुने फिर्यादीचे हाताच्या आंगठया जवळ मारहाण करून जखमी केले. तसेच आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 452, 324, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा राऊत हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर